ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १८ मे, १९५५ अंक १०

## विविध माहिती

**दीर्घायुषी लोकांचा अभ्यास**—अमेरिकेंतील एका रुग्णालयानें दीर्घायुषी लोकांचा अभ्यास करण्याचें ठरविलें आहे. संस्थेनें जगांतील सर्वांत अधिक आयुर्मान लाभलेला २५ स्त्री-पुरुषांना अमेरिकेला येण्याचें पाचारण केलें आहे. भारतीय सरकारच्या आरोग्य खात्यातर्फे भारतामधील शतायुषी लोकांची या कामासाठी चौकशी करण्यांत येत आहे.

**उडत्या बशांचें रहस्य**—जगाच्या निरनिराळ्या भागांत उडत्या बशा दिसल्याच्या वार्ता मधून मधून येत असतात. ह्या रहस्यमय वार्ताविषयीं बोलतांना ब्रिटनचे प्रमुख ज्योतिर्विद् सर हॅरोल्ड स्पेन्सर म्हणाले कीं, उडत्या तबकड्या म्हणजे गप्पा आहेत. ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्याच्या शक्यतेबद्दलहि त्यांनीं शंका प्रदर्शित केली. असा प्रवास करणें शक्य होण्यास माणसाला अद्याप शेंकडों वर्षें थांबावें लागेल, असें त्यांचें मत आहे.

**पाली भाषेंतील हस्तलिखितें**— सीलोनच्या सरकारनें नालंद येथील बुद्धविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेला पाली भाषेंतील ३० हस्तलिखित ग्रंथांचे खंड नजर म्हणून दिले आहेत. हे ग्रंथ स्वीकारण्याचा औपचारिक समारंभ बिहारचे गव्हर्नर, श्री. दिवाकर, ह्यांच्या अध्यक्षतेखाली पाटणा येथें साजरा करण्यांत आला.

**अहमदाबाद शहरांतील घरबांधणी**—अहमदाबाद कॉर्पोरेशननें शहरांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर घरें बांधण्याची योजना तयार केली आहे. कॉर्पोरेशनचे मेयर श्री. चिनुभाई चिमणलाल ह्यांनीं वरील माहिती सांगतांना असेंहि सांगितलें कीं ह्या कामासाठी भारतीय सरकारकडे ७५ लाख रुपयांच्या कर्जाची मागणी कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत आली आहे.

**आंध्र राज्यांत चुनखडीचा दगड**— आंध्र राज्यांतील कृष्णा जिल्ह्यांत भारतीय सरकारच्या भूस्तरशास्त्रज्ञांना उत्तम प्रतीच्या चुनखडीच्या दगडाच्या खाणी सांपडल्या आहेत. ह्या खाणींमधून सुमारें २५ कोटी टन चुनखडी निघूं शकेल असा त्यांचा अंदाज आहे. चुनखडीचा पोर्टलंड सिमेंट बनविण्याच्या कामीं उपयोग होतो.

**कुटुंबनियोजन शक्य होणार**—येत्या पांच वर्षांत निश्चितपणें संततिप्रतिबंध करणारी गोळी तयार होऊं शकेल असें मत अमेरिकेंतील एका जीवशास्त्रज्ञानें व्यक्त केलें आहे. भारतामधील लोकसंख्या आणि साधनसंपत्ति ह्यांच्यांत समतोलता राखण्यासाठी अशा प्रकारच्या हमखास उपायाची अतिशय जरूर आहे असें मत लेडी धन्वंतरी रामराव ह्यांनीं ह्याविषयीं व्यक्त केलें आहे.

**साखरेच्या कारखान्याला सरकारी कर्ज**—राहुरी भाग सहकारी साखर कारखान्याला ४३ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्याचें आतांपर्यंत ७,५०,००० रुपयांचें भाग भांडवल खपलेलें आहे. आणखी तीन महिन्यांत ते १० लाखापर्यंत जाईल असा अंदाज आहे. कारखाना १९५६–५७ मध्यें सुरू होईल व त्यांत रोज १,००० साखरेचीं पोतीं तयार होतील.

**न्यूयॉर्क ते लंडन ३० मिनिटांत ?**—अणुशक्तीवर चालणारी पहिली पाणबुडी बांधणारे अमेरिकन कारखानदार मि. जॉन हॉपकिन्स म्हणाले कीं, कांहीं वर्षांत न्यूयॉर्क ते लंडन हा प्रवास अणुशक्तीच्या साह्यानें ३० मिनिटांत पुरा होण्याची शक्यता आहे. एंजिनें, विमानें, मोटारी ह्यांच्यासाठी अणुशक्ति वापरणें अशक्य कोटींतील नाहीं. पण ह्या बाबतींत रशिआनें जर आघाडी मारली तर अमेरिकेवर घोर परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**आशिआंतील सर्वांत मोठें औद्योगिक प्रदर्शन**—आशिआंतील सर्वांत मोठ्या औद्योगिक प्रदर्शनाचें उद्घाटन टोकिओ येथें गेल्या आठवड्यांत करण्यांत आलें. प्रदर्शनांत यंत्रसामुग्रीनेंच अधिक जागा व्यापलेली आहे. २१ देशांतील सुमारें ३,००० कारखानदारांनीं आपला माल प्रदर्शनांत मांडला आहे. त्यांत अमेरिकन, पश्चिम जर्मन, स्विस व ब्रिटिश कारखानदार आहेत.

**सौराष्ट्रामधील रेल्वे-प्रवाशांची मागणी**—सौराष्ट्र रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशनच्या सभासदांनीं रेल्वे बोर्डाचे सदस्य श्री. माथुर ह्यांची गांठ, घेऊन गुजरातमधील ६०० मैल अरुंद रुळाचा रेल्वे मार्ग रुंद रुळाचा करण्यांत यावा अशी मागणी केली. गुजरातची आर्थिक प्रगति वाहतुकीच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळें अवघड होत आहे, असें त्यांचें म्हणणें आहे.

**वृक्षांचें संरक्षण**—मलबार आणि दक्षिण कॅनरा ह्या भागांतील थंड हवेच्या ठिकाणचीं झाडें वाटेल तशीं तोडलीं जातात ह्या गोष्टीकडे मद्रासचे गव्हर्नर श्री. श्रीप्रकाश ह्यांनीं मद्रासच्या शेतकी मंत्र्यांचें लक्ष वेधलें. मन मानेल तशीं झाडें तोडण्यावर मद्रास सरकार आतां बंधनें घालणार आहे.

**सुरतेजवळ नवा पूल**—सुरत शहरापासून ५० मैलांवर अंबिका नदीवर एक नवा पूल बांधण्यांत येणार आहे. ह्या पुलासाठी सुमारें ६ लाख रुपये खर्च येईल. त्यांपैकी सुमारें १ लाख रुपयांची रकम ह्या भागांतील खेडुतांनीं जमविली आहे. पुलामुळें ३० खेड्यांची चांगली सोय होईल.

**भारत-पाकिस्तान व्यापारी वाटाघाटी**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत व्यापारी करार करण्याच्या दृष्टीनें कराची येथें दोन्हीं देशांच्या प्रतिनिधींत बोलणीं लवकरच सुरू होणार आहेत असें समजतें. १९५२ पासून उभयता देशांत ताग व कोळसा ह्या दोन जिनसांखेरीज इतर मालाबद्दल करार नव्हता. भारतामधील सिनेमाच्या धंद्याचे प्रतिनिधी संकल्पित करारांत बोलपटांच्या निर्यातीची सोय व्हावी असा आग्रह धरीत आहेत.

**इंग्लिश बाईचा संपत्ति संन्यास**—कौंटेस ऑफ मेयो ह्या श्रीमंत बाईनीं आपली सर्व संपत्ति सोडून दिली आहे. दुसऱ्या महायुद्धांत जर्मन विमानांनीं केलेल्या बॉंबफेकींत त्यांचें लंडनमधील प्रासादतुल्य घर जमीनदोस्त झालें. तेव्हांपासून त्यांच्या मनप्रवृत्तींत पालट होऊन त्या धार्मिक वृत्तीच्या झाल्या. नंतर त्या जपानमध्यें गेल्या व अणुबॉंबच्या स्फोटांत जखमी झालेल्या २३ जपानी कोळ्यांसाठी त्यांनीं एक रुग्णालय काढलें.

**नव्या अमेरिकन विनाशिका**—आरमारी बोटींपैकी विनाशिका प्रकाराच्या बोटींच्या आकारांत व शस्त्रास्त्रांत वेळोवेळीं बदल झालेले आहेत. आतां ह्या विनाशिका अणुशक्तीवर चालविण्याची तयारी करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें, बोटीवरून शक्तिप्रेरित आयुधें सोडण्याचीहि व्यवस्था करण्यांत येत आहे.

**पहिल्या वर्गाच्या उतारूंना सवलत**—पहिल्या वर्गानें प्रवास करणाऱ्या रेल्वेच्या उतारूंना प्रत्येक रात्रीला ५ रुपये घेऊन रेल्वेखात्यातर्फे बिछाने पुरविले जात असत. बिछान्यांसाठी घेण्यांत येणारा आकार आतां कमी करण्यांत आला आहे. आतां दररात्रीला तीनच रुपये घेण्यांत येतात.

**आंध्रमधील महारोगांवर नियंत्रण**—आंध्र सरकारनें मध्यवर्ती सरकारच्या मदतीनें महारोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी दोन केंद्रें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक केंद्रासाठी ४१,८०० रुपयांची रक्कम मदतीदाखल मंजूर करण्यांत आली आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## सिंडिकेट त्रिवेणी संगम आहे

(१) तलवार बहाद्दर मराठ्यांनीं सिंडिकेटला उसाकरितां जमिनी दिल्या आहेत.

(२) शिवरायाच्या "तोरणा" व "राजगड" या किल्ल्यांना पर्जन्याच्या होणाऱ्या अभिषेकाचें पाणी सिंडिकेटच्या उसाला सरकारनें दिलें आहे.

(३) महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा अंतःकरणांत जिव्हाळा असलेल्या मध्यमवर्गानें सिंडिकेटला भांडवल दिलेलें आहे.

यामुळें

**साखरेचें उत्पादन वाढलें व दहा टक्क्यांपेक्षा जास्त नफ्याची पक्की खात्री आली**

—सांगलीचे श्रीमान विष्णुपंत वेलणकर यांचें "कुंकू" चित्रपटांतलें आवडतें पद—

**::: मन शुद्ध तुझं तुला र गड्या भीति कशाची :::**

—असें जर आहे तर—

रिपोर्ट, रिपोर्टाच्या जाहिराती, लेख, पत्रकें या बागुलाची "भीति कशाची"

—फक्त भागीदारांच्या माहितीकरितां—

**ज्यांना शेअर विकावयाचेच असतील त्यांनीं मॅनेजिंग एजण्ट यांना लिहावें.**

९८० सदाशिव पेठ,<br>कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणें २.<br>दि. ८-५-१९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,<br>मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. १८ मे, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट

### जॉइंट सिलेक्ट कमिटीनें बिलांत केलेले बदल

नव्या कंपनी कायद्याच्या बिलावरील जॉइंट सिलेक्ट कमिटीचा अहवाल पार्लमेंटला ह्या महिन्याचे प्रारंभीं सादर करण्यांत आला. ह्या बिलांत आतां ६४२ कलमें व ९ परिशिष्टें आहेत. लोकसभेंत बिल प्रथम २ सप्टेंबर, १९५३ रोजीं मांडण्यांत आलें व मे १९५४ मध्यें तें सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यांत आलें. ह्या बिलाचें पक्क्या कायद्यांत त्वरेनें रूपांतर करण्यांत यावें, पार्लमेंटच्या येत्या बैठकींत त्याचा कायदा मंजूर करण्यांत यावा, अशी सिलेक्ट कमिटीची शिफारस आहे. कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती सरकारनें एक स्वतंत्र खातें निर्माण करावें, अशीहि कमिटीची सूचना आहे.

मॅनेजिंग एजन्सीबाबत खालीलप्रमाणें तरतुदी करण्यांत आल्या आहेत. पुढील तीन गोष्टींविषयीं भारत सरकारची खात्री झाल्याविना, तें मॅनेजिंग एजंटाच्या नेमणुकीस मंजुरी देणार नाहीं. (१) कंपनीला मॅनेजिंग एजंट असणें सार्वजनिक हिताचे विरुद्ध नाहीं, (२) सुचविलेला मॅनेजिंग एजंट हा लायक असून मॅनेजिंग एजन्सीच्या अटी योग्य आहेत, (३) मॅनेजिंग एजंटानें ज्या अटी पाळल्या पाहिजेत असें सरकारनें सांगितलें,त्या पाळल्या गेल्या पाहिजेत. मॅनेजिंग एजन्सीच्या मुदतीची कमाल मर्यादा सांगितली आहे, तिच्यापेक्षा दीर्घ काळ मुदतीसाठी मॅनेजिंग एजंट नेमला, तर सबंद काळाचीच मॅनेजिंग एजन्सी रद्द होईल; जादा काळापुरतीच रद्द होणार नाहीं. १५ ऑगस्ट, १९६० पासून सध्यांचे सर्व मॅनेजिंग एजंट आपल्या जागा खाली करतील. अर्थात्, ह्या तारखेपूर्वी मॅनेजिंग एजंटाची ह्या कायद्याखालीं पुन: नेमणूक केली, तर गोष्ट वेगळी. मध्यवर्ती सरकारची अशा नेमणुकीस मंजुरी लागेलच.

१५ ऑगस्ट, १९६० नंतर कोणासहि १० कंपन्यांपेक्षा अधिक कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट रहातां येणार नाहीं. कंपनीच्या मॅनेजिंग एजंटाचा निकट सहकारीहि हा १० चा आंकडा मोजतांना विचारांत घेतला जाईल. मॅनेजिंग एजन्सी फर्मचा प्रत्येक सभासद मॅनेजिंग एजंटच समजला जाईल. लिमिटेड कंपनी मॅनेजिंग एजंट असेल, तर तिचा प्रत्येक डायरेक्टर, मॅनेजर किंवा त्या कंपनीचा मॅनेजिंग एजंट म्हणून काम करणारा मॅनेजर किंवा फर्मचा सभासद हा १० चा आंकडा मोजतांना लक्षांत घेतला जाईल. (अ) जी सबसिडिअरी किंवा होल्डिंग कंपनी नाहीं अशी प्रायव्हेट कंपनी, (ब) अन्‌लिमिटेड कंपनी, (क) नफ्यासाठी जी चालविली जात नाहीं किंवा जिला डिव्हिडंड दण्याची मनाई आहे, अशी असोसिएशन, ह्यांची ज्या दहापेक्षा अधिक कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी एके ठिकाणीं एकवटूं नये अशी तरतूद आहे, त्या कंपन्यांत गणना केली जाणार नाहीं. १० कंपन्यांपेक्षा अधिक कंपन्यांचा मॅनेजिंग एजंट म्हणून जो काम करील, तो अशा जादा प्रत्येक कंपनीबाबत दररोज १,००० रुपये दंडास पात्र होईल.

बहुतेक मॅनेजिंग एजन्सीज ह्या फर्म्स किंवा लिमिटेड कंपन्या ह्यांच्या हातीं आहेत. ह्या फर्मच्या किंवा लिमिटेड कंपनीच्या घटनेंत कांहींहि बदल झाला तर त्याला सरकारची सहा महिन्यांत मान्यता मिळविली पाहिजे. अशी मान्यता सरकारनें दिली नाहीं, तर ती फर्म किंवा कंपनी मॅनिजिंग एजंट म्हणून रहाणार नाहीं. कंपनी मालाचें उत्पादन करीत असेल, तर त्या मालाचा भारतांत जो खप होईल, त्यावर मॅनेजिंग एजंटाला कमिशन मिळणार नाहीं.

अशा रीतीनें, जॉइंट सिलेक्ट कमिटीनें मॅनेजिंग एजन्सी पद्धतींत फार महत्त्वाचे बदल घडवून आणले आहेत. हे बदल उद्योगधंद्यांच्या वाढीस पोषक होणार नाहींत, अशी उद्योगपतींची तक्रार ऐकूं येते; परंतु, मॅनेजिंग एजन्सीच्या अधिकाराचा कित्येक एजंटांनीं केलेल्या दुरुपयोगाची ती प्रतिक्रिया आहे.

## सेफ्टी रेझरच्या पात्यांचा धंदा

दुसऱ्या महायुद्धानंतर भारतांत प्रथमच सेफ्टी रेझरचीं पातीं तयार करण्याचे पांच कारखाने काढण्यांत आले. ही वस्तु रोज लागणारी असल्यानें तिच्या बाबतींत भारत स्वयंपूर्ण करण्याचा हेतु तर कारखाने काढण्याच्या मागें होताच. परंतु पात्यांसाठी खर्च करावी लागणारी परदेशी हुंडणावळ वांचविण्याचाहि दुसरा हेतु होता. १९४९ ते १९५४ ह्या काळांत भारतामधील पात्यांची बाजारपेठ नव्यानें निघालेल्या कारखान्यांनींच काबीज केली होती असें म्हटलें तरी चालेल. इतकेंच नव्हे, परदेशांच्या प्रसिद्ध पात्यांची तुलना करतां भारतांत तयार झालेलीं पातीं बऱ्या दर्जाचीं ठरलीं. ह्या धंद्यांतील उत्पादनक्षमतेनेंहि झपाट्यानें प्रगति केली. १९४८ ते १९५४ ह्या काळांत पात्यांची उत्पादनक्षमता ३ कोटी पात्यांपासून ४० कोटी पात्यांपर्यंत भराभर वाढली. भारतांत दरवर्षी सुमारें १० कोटी पातीं लागतात असा अंदाज आहे. भारतामधील कारखाने अशा रीतीनें उत्पादनांत स्पर्धा करीत असतांच परदेशी पात्यांची आयात करण्यास प्रारंभ झाला. त्यामुळें बाजारांत पात्यांचा सुकाळ झाला आणि कांहीं महिन्यांतच सर्व भारतीय कारखाने बंद करावे लागले. कांहीं दिवसांपूर्वी एका भारतीय कारखानदारानें एका प्रसिद्ध परदेशी कंपनीकडून ती तयार करीत असलेलीं पातीं तयार करण्याचे हक्क विकत घेतले, अगदीं नवीन पद्धतीची यंत्रसामुग्रीहि विकत घेतली आणि परकीय तज्ज्ञांची मदतहि मिळविली. आतां हा कारखाना जगांतील एक मोठा कारखाना गणला जातो. त्यांत दरमहा २·५ कोटी पातीं तयार होऊं शकतील.

**भोपाळमध्यें मेडिकल कॉलेज**—भोपाळचें सरकार भोपाळमध्यें सरकारी मालकीचें मेडिकल कॉलेज लवकरच काढणार आहे. कॉलेजच्या इमारतीसाठी ६० लक्ष रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमाला ऑगस्ट महिन्यापासून प्रारंभ होईल. भोपाळच्या नबाबाच्या पुतण्यानें कॉलेजसाठी दोन इमारती दिल्या आहेत. त्यांचा उपयोग कॉलेजच्या अध्यापकवर्गाच्या राहण्याकडे होईल.

## रिझर्व्ह बँकेचें ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेज

( श्री. दा. ना. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. पुणें ).

सन १९४० नंतर बँकिंगचे धंद्यांत बरीच प्रगति झाली. भारताच्या निरनिराळ्या भागांत अनेक नवीन बँका निघाल्या, व बँकांचें शाखा-विस्ताराचें जाळेंहि सर्व देशभर पसरलें. लढाईमुळें, लोकांचे हातांत पैसाहि मुबलक खेळूं लागला. या काळांत निरनिराळे अनेक धंदे निर्माण झाले. साहजिकच, बँकांमधील नोकरवर्गाची संख्याहि या काळांत झपाट्यानें वाढली.

दरम्यानचे काळांत रिझर्व बँकेला व्यापारी बँकांची तपासणी करण्याचा हक्क मिळाला. रिझर्व बँकेच्या तपासणीमध्यें, बँकांचा नोकरवर्ग बँकिंगचे सर्वांगीण प्रगतीसाठी अधिक कार्यक्षम असावयास पाहिजे असें आढळून आलें. बँकिंगची प्रगति व वाढ स्थिर पायावर व्हावयाची असेल, तर बँकांमधील नोकरवर्ग अनुभवी व आपले कामांत वाकबगार असावयास पाहिजे.

### स्थापनेची पूर्वपीठिका

या विषयाचा साधक-बाधक विचार करण्याकरितां रिझर्व बँकेनें एक समिति नेमली व तिच्या शिफारशीनुसार मुंबई येथें बँकर्स ट्रेनिंग कॉलेजची स्थापना १९५४ सालीं करण्यांत आली. या कॉलेजचे प्रमुख ( प्रिन्सिपॉल ) म्हणून श्री. एच्. एद्. हेन्स यांची नेमणूक झाली असून श्री. एफ्. एच्. हार्वे हे तेथें मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहेत. कॉलेजचा सर्व शिक्षणक्रम या दोघांचे सल्ल्यानुसार रिझर्व बँकेनें ठरविलेला आहे. या दोन ब्रिटिश तज्ज्ञांची नेमणूक कोलंबो प्लॅनखाली अल्प कालापुरती मर्यादित असून, त्यानंतर ते ग्रेटब्रिटनला परत जाणार आहेत. या दोन्ही गृहस्थांना मिडलँड बँकेमधील शिक्षणाचा दीर्घ अनुभव आहे. हे दोन्ही गृहस्थ आपल्या व्यवसायांत पूर्ण अनुभवी व माहितगार असून, अत्यंत परिश्रम घेऊन त्यांनीं या अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे.

वरील तज्ञांचे हाताखालीं रिझर्व बँकेंतील तीन अधिकारी : श्री. सरकार, श्री. गुलमहंमद, व श्री. राजे आणि इंपिरियल बँकेंतील एक वरिष्ठ अधिकारी श्री. संबाटा हे अध्यापक म्हणून काम करीत असतात. सर्व शिक्षकमंडळी आपआपल्या कामांत निष्णात असून त्यांची विद्यार्थ्यांशीं वागणूक अत्यंत मनमिळाऊ व सौजन्यपूर्ण असते. त्यामुळें येथील वातावरण नेहमीं प्रसन्न व खेळीमेळीचें असतें.

या कॉलेजला 'ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेज' असें नांव असून बँकांनीं निवड केलेल्या व सुचविलेल्या अधिकारी मंडळींतून विद्यार्थ्यांची निवड रिझर्व बँक हीं कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांचे सल्ल्यानुसार करते. प्रत्येक तुकडी चोवीस विद्यार्थ्यांची असून अभ्यासक्रमाची मुदत दोन महिन्यांची असते. विद्यार्थ्यांची निवड एक्सचेंज बँका, शेड्यूल्ड बँका, बिगर-शेड्यूल्ड बँका, ह्या सर्वांमधून केली जाते. निवड करते वेळीं विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा व बँकिंगमधील अनुभव, ह्याचा कसोशीनें विचार केला जातो. सध्यांच्या रिझर्व बँकेचे इमारतींमध्यें जागा अपुरी असल्यानें, हें कॉलेज मेट्रोपॉलिटन इन्शुरन्स कंपनीच्या फोर्टमधील इमारतीमधील पहिल्या मजल्यावर भरतें. कॉलेजमध्यें व्याख्यानाकरितां एक मोठी खोली असून चार शिक्षकांचेकरितां निरनिराळ्या चार लहान खोल्या आहेत. विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असल्यानें, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणें शक्य होतें.

ह्या कॉलेजमध्यें विद्यार्थी, उत्तरेस दिल्लीपासून दक्षिणेस मद्रास पर्यंत, पश्चिमेस अहमदाबादपासून पूर्वेस कलकत्त्यापर्यंत, सर्व भागांतून येत असतात. भाषानुसार बोलावयाचें झाल्यास, हिंदी, इंग्रजी, तामीळ, तेलगू, मराठी, कानडी, सिंधी, बंगाली, वगैरे भाषांचे प्रतिनिधी येथें असतात. अशा प्रकारें, येथील विद्यार्थ्यांचा मेळावा म्हणजे भारतांतून बँकिंग क्षेत्रांतील जमलेल्या विद्यार्थ्यांचें एक शैक्षणिक शिबिर म्हटल्यास योग्य होईल.

ह्या वेळेस महाराष्ट्रांतून मिरज स्टेट बँकेचे श्री. शिराळकर, न्यू सिटिझन बँकेचे श्री. गांडेकर, बँक ऑफ कोंकणचे श्री. गरगटे, बँक ऑफ महाराष्ट्राचे श्री. पडनेकर आणि सांगली बँकेचे श्री. कुलकर्णी, यांची निवड झालेली होती.

व्यापारी बँकांतील नोकरवर्गाच्या शिक्षणाची सोय आतापर्यंत भारतांत कोठेंहि नव्हती. त्यामुळें ह्या कॉलेजची स्थापना अत्यंत महत्त्वाची घटना मानावयास पाहिजे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स ही फक्त परीक्षा घेणारी संस्था असून तिचे मार्फत प्रत्यक्ष शिक्षणाची कोणतीहि सोय नाहीं. सहकारी बँकांतील नोकरवर्गाकरितां मात्र पुणें येथें को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज कांहीं वर्षांपासून चालू आहे.

### शिक्षणक्रम व प्रात्यक्षिकें

ह्या कॉलेजमधील प्रत्येक तुकडीची शिक्षणाची मुदत आठ आठवड्यांची असल्यानें, येथें शिकविण्यांत येणारे विषय त्या मुदतींत संपतील अशा रीतीनें अभ्यासक्रमाची रचना करण्यांत आलेली आहे. या मुदतींत, खातेदाराचें खातें उघडण्यापासून बँकिंगच्या विविध अंगोपांगांची माहिती देण्यांत येते. सेफ कस्टडी, बिल कलेक्शन, पत्रव्यवहार, परदेशी बिलें, ताळेबंद, चेकचा वटाव, कर्जें, वगैरे सर्व विषयांची माहिती घेऊन विद्यार्थी ह्या कॉलेजांतून परत जातांना, बँकेचा एक निष्णात अधिकारी व आपल्या धंद्यांत पूर्ण वाकबगार बँकर म्हणून बाहेर पडतो.

येथील शिक्षणक्रमांत नुसतें पुस्तकी ज्ञानच देण्यांत येत नसून, प्रात्यक्षिकावरहि जरूर तो भर देण्यांत येत असतो. कोणताहि पाठ शिकविण्यांत आला, कीं दुसरे दिवशीं त्यावर एक अगर अधिक प्रात्यक्षिकें करून घेण्यांत येत असतात. तसेंच, विद्यार्थी हा गिऱ्हाईक या नात्यानें वागतो कसा, बँकेचा अधिकारी या नात्यानें गिऱ्हाइकांच्या अडचणी समजून घेतो कसा, ह्या विषयांची चांचणी कौशल्यानें "मॅनेजर-गिऱ्हाईक" यांचे संवादानें घेण्यांत येते. तसेंच, दर शनिवारीं विद्यार्थ्यांच्या गटागटांनीं तोंडी प्रश्नोत्तरांच्या साहाय्यानें शिकविलेल्या भागाची उजळणी करून घेण्यांत येत असते.

आमच्या तुकडीला गोदीला भेट देऊन तेथील कामकाजाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यांत आली. परदेशीं जाणारा माल कसा पाठवला जातो किंवा परदेशांतून माल आल्यानंतर तो सोडवून घेण्यापासून तो गोदीमधील गुदामांत ठेवून घेण्यापर्यंत सर्व माहिती करून देण्यांत आली. तसेंच, कारखान्याचें काम कसें चालतें हें पहाणेकरितां प्रीमिअर ऑटोमोबाइल्स ह्या कारखान्यास भेट देण्यांत आली. कच्च्या मालापासून पक्का माल तयार होईपर्यंत कोणकोणत्या अवस्थांतून जावें लागतें व हा माल गिऱ्हाईकापर्यंत कशा रीतीनें पोंहोचवला जातो, याची माहिती करून देण्यांत आली.

ह्याशिवाय, या कॉलेजमध्यें ज्या त्या विषयांवरील तज्ज्ञ व अनुभवी माणसांना निमंत्रण देऊन त्यांचे ज्ञानाचा

अनुभव विद्यार्थ्यांना करून देण्यांत येतो. रिझर्व बँकेंतील बँकिंग रिसर्च खात्याचे प्रमुख डॉ. पिंटो व कायदा खात्याचे सल्लागार श्री. मेहता यांचीं माहितीपूर्ण व्याख्यानें झालीं. तसेंच, प्रसिद्ध शेअर आणि स्टॉक ब्रोकर, श्री. पारेख यांचे मनीमार्केटवर व इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन मुंबई शाखाधिकारी श्री. मलहोत्रा यांचे इं. फि. कॉर्पोरेशनचें कामकाज या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झालें. याशिवाय, श्री. डी. फ्रीमन व श्री. मॅकॉटोश या ब्रिटिश तज्ज्ञांचीं विदेशी हुंडणावळवर व्याख्यानें करण्यांत आलीं. सिडनहॅम कॉलेजचे प्रो. घोंगडे यांचें हिंदी बँकिंग या विषयावर एक व्याख्यान झालें.

### खेळीमेळीचें वातावरण

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जाबरोबर तितकेंच महत्त्वाचें अंग म्हणजे त्यांची समाजाचा घटक म्हणून आदर्श वागणूक, हें आहे. याकरितां घारापुरी येथील लेण्यांना भेटीचा कार्यक्रम ठरविण्यांत आला होता. ही भेट अगर सहल म्हणजे या वर्गाचें स्नेहसंमेलनच म्हणावयास हरकत नाहीं व आपुलकीनें विद्यार्थी व शिक्षक यांनीं यामध्यें खेळीमेळीनें भाग घेतल्यानें या संमेलनाची आठवण लवकर बुजणार नाहीं. हा दिवस म्हणजे या वर्गाचा, उत्साहाचा व आनंदी वातावरणाचा मंगलदिन म्हणूनच मानावयास पाहिजे.

या शिक्षणक्रमांत तत्त्व आणि प्रत्यक्ष प्रयोग यांना बरोबरीचें महत्त्व दिल्यानें अगर त्यांची सांगड योग्य रीतीनें घातल्यानें शिक्षण एकांगी होत नसून विद्यार्थ्यांवर दैनंदिन पडणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास तो पूर्ण समर्थ होतो. विद्यार्थ्यांचे हातून अनेक प्रात्यक्षिकें करून घेतल्यानें त्यास बँकिंगचे क्षेत्रांतील विविध अंगांची माहिती चांगली होऊं शकते. याशिवाय, विविध क्षेत्रांत प्रत्यक्ष काम करीत असलेल्या तज्ज्ञांचीं व्याख्यानें केल्यानें त्यांचे अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना सहज मिळूं शकतो. याशिवाय, सर्व शिक्षकांचा प्रेमळ स्वभाव व येथील आनंदी व प्रसन्न वातावरण याचाहि विद्यार्थ्यांचे मनावर चांगला परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं.

---

### नगर येथील औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरीची परीक्षा

ता. २१ ते २३ मार्च १९५५ ला नगर येथें झालेल्या औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरीच्या परीक्षेंत खालील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत:—

**दुसरा वर्ग**—(१) आढकर म. भ. (२) दरेकर वि. ग. (३) ढुमणे भा. रा. (४) गोसावी भा. रा. (५) जाधव गे. गो. (६) कोरडे भा. रा. (७) खोज बा. पां. (८) सामळ बा. वि. (९) वाकचौरे ना. वि.

**तिसरा वर्ग**—(१) बडधे सो. र. (२) बोरुडे हि. रे. (३) चासकर द. ग (४) घोडके आं. गे. (५) जालिंद्रे सा. वि. (६) काळे भा. शं. (७) कार्ले भिं. द. (८) कोडम रा. न. (९) मनेळ मा. र. (१०) मनसुखे द. बा. (११) मुरूमकर मो. वि. (१२) सातपुते भि. तु. (१३) संदूपटला रा. रा. (१४) तोडकर द. रा. (१५) पाद्वणे मा. ना. (१६) येनम चं. ल.


# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शे. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्षे मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील

पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,१७,००० |
| ठेवी | रु. ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## भारतामधील चहाचे मळे व त्यांचें उत्पन्न

इंडियन टी-बोर्डातर्फे १९५४ सालांतील भारतीय चहाच्या धंदासंबंधीं आंकडेवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. त्या माहितीवरून भारतीय सरकारला आणि सर्व देशाला ह्या धंद्यापासून किती फायदा होतो तें चांगल्या तऱ्हेनें दिसून येतें. १९५४ सालांत भारतामधील चहाच्या उत्पादनांत ३·१ कोटी पौंडांची वाढ झाली, आणि त्यामुळें भारताला मिळालेल्या परदेशीय चलनांत २८ कोटी रुपयांपेक्षा अधिक वाढ झाली. निर्यातींत सुमारें ५·१ कोटी पौंडांची घट झाली असतांहि वरील वाढ झालेली आहे. चहावर घेण्यांत येणाऱ्या करांच्या रूपानें भारतीय सरकारच्या उत्पन्नांतहि १९५४–५५ सालीं ८ कोटी रुपयांची वाढ झालेली दिसून येते.

टी-बोर्डानें अशा प्रकारची माहिती देणारी ही पहिलीच पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. दरवर्षी अशी पुस्तिका बोर्डातर्फे प्रसिद्ध करण्यांत येणार असल्याचें समजतें. पुस्तिकेंत दिलेल्या माहितीप्रमाणें १९५० सालीं भारतामधील चहाचें एकूण उत्पादन ६१·३३ कोटी पौंड होतें. १९५३ सालीं तें ६०·७७ कोटी पौंड झालें. राज्यांच्या अनुरोधानें विचार करतां चहाच्या लागवडीचें क्षेत्र आणि त्याचें उत्पादन ह्या दोन्ही दृष्टींनीं आसामचा अनुक्रम पहिला लागतो. आसाम राज्यांत चहाच्या लागवडीचें एकूण क्षेत्र ३,८६,०९,६९४ एकर आहे. इतक्या विस्तीर्ण लागवडीच्या मळ्यांत ३३·९३ कोटी पौंड चहाचें उत्पादन झालें. त्यानंतर पश्चिम बंगालचा अनुक्रम लागतो. पश्चिम बंगालमधील चहाच्या लागवडीचें क्षेत्र सुमारें १,९६,६०,३३४ एकर आहे, आणि चहाचें उत्पादन १६·०४ कोटी पौंडांच्या आसपास आहे. ३१ मार्च, १९५४ अखेर मद्रास व कूर्ग राज्यांतील चहाची लागवड ८५,८६,७९२ एकरांवर पसरलेली होती. उत्पादन ६·७७ कोटी पौंड झालें. त्रावणकोर-कोचीन राज्यांत चहाची लागवड ८३,५१,४११ एकरांत करण्यांत आली आणि चहाचें एकूण उत्पादन ५·८६ कोटी पौंड झालें. गेल्या पांच वर्षांतील चहाच्या उत्पादनाची परिस्थिति लक्षांत घेतां असें दिसून येतें कीं, चहा उत्पादन करणाऱ्या प्रमुख राज्यांतून उत्पादन लक्षांत भरण्याइतकें वाढलेलें आहे. पश्चिम बंगालमधील चहाच्या उत्पादनांत मात्र १·९ कोटी पौंडांची घट झालेली आहे.

चहाच्या मळ्यांसंबंधीं पुढीलप्रमाणें माहिती संकलित करण्यांत आली आहे. ३१ मार्च १९५४ अखेर चहाच्या मळ्यांची संख्या ६,३१० होती, १९५३ सालीं मळ्यांची संख्या ६,२६२ होती आणि १९५२ सालीं ६,२४० होती. मद्रासमध्यें व कूर्गमध्यें सर्वांत अधिक म्हणजे २,७७२ मळे होते. त्रावणकोर–कोचीन राज्यांत १,१३६ मळे होते, पंजाबमध्यें ९१२ होते, आसाममध्यें ७८९ होते आणि पश्चिम बंगालमध्यें २९६ होते. आसाम राज्यांत सर्वांत अधिक चहाचें उत्पादन होतें. पण आसाममधील मळ्यांची संख्या मात्र पंजाबमधील मळ्यांच्यापेक्षा कमी आहे. पंजाबमधील मळ्यांचें चहाचें उत्पादन अवघें २० लाख पौंड आहे. १९५३–५४ सालीं भारतामधील चहाच्या खपाचा अंदाज १७·५६ कोटी पौंड असा करण्यांत आला आहे. भारताची लोकसंख्या ३६ कोटींच्या आसपास आहे. त्या दृष्टीनें चहाचा दरमाणशीं खप फक्त ०·४८ पौंडच पडतो.

## त्रावणकोर–कोचीन मधील मच्छीमारी

नॉर्वेच्या सरकारनें भारतांत सामाजिक साह्याची एक योजना आखून ती अमलांत आणली आहे. डॉ. डी. लुंड हे ह्या योजनेचें मार्गदर्शन नॉर्वेतर्फे करीत आहेत. क्विलॉन जवळच्या तीन खेड्यांतील कोळ्यांना मच्छिमारीच्या धंद्याबाबत आर्थिक व तांत्रिक साह्य ह्या योजनेतर्फे देण्यांत येत आहे. योजना अर्थातच प्रायोगिक स्वरूपाची आहे. कोळ्यांना साह्य करण्यासाठी मुख्यतः दोन गोष्टी करण्यांत येत आहेत. एक म्हणजे त्यांच्या होड्यांना पेट्रोलवर चालणारीं एंजिनें बसविण्यांत येत आहेत. दुसरी, म्हणजे कोळ्यांना मच्छिमारीच्या धंद्याच्या अधिक चांगल्या पद्धति शिकविण्यांत येत आहेत. या सुधारलेल्या पद्धतींनीं माशांची पैदास अधिक प्रमाणांत होऊं लागेल. आतापर्यंत योजनेंत ठरविण्यांत आलेल्या बाबींवर ४० लाख रुपये खर्च करण्यांत आले आहेत आणि १५ कोळ्यांना मासे पकडण्याच्या आधुनिक पद्धतींचें शिक्षण देण्यांत आलें आहे. मासे पकडण्यांत आल्यावर ते टिकविण्यासाठी शीतगृहांची फार जरूर असते. नाहींतर ते नासून जातात. म्हणून मासे साठवून ठेवण्यासाठी मोठें शीतगृह बांधण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत येणार आहे. त्रावणकोर–कोचीनचें सरकार कोळ्यांमध्यें सहकारी संघटना लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा संस्था स्थापन केल्यानें कोळ्यांना दलालांवर अवलंबून रहावें लागणार नाहीं. आज भारतांत मच्छीमारीच्या धंद्याची जी स्थिति आहे तीच ५० वर्षांपूर्वी नॉर्वेंत होती, अशी माहिती डॉ. लुंड ह्यांनीं सांगितली.

## महमदाचा पुतळा न्यूयॉर्कच्या न्यायालयाच्या इमारतींतून काढून टाकला

न्यूयॉर्क येथील अपेलेट कोर्ट इमारतीला गेलीं ५२ वर्षें जगांतील १० प्रमुख स्मृतिकारांचे पुतळे शोभा देत आले आहेत. मनु, महमद, मोझेस, कनफ्युशिअस, झोरास्टर, जस्टिनिअन, स्पार्टाचा लिकर्गस, आल्फ्रेड दि ग्रेट, फ्रान्सचा १४ वा लुई, हे ते दहा स्मृतिकार होत. ह्यापुढें महमदखेरीज बाकीचे नऊ स्मृतिकार न्यूयॉर्कच्या सात अपेलेट जज्जांच्या निवाड्यांचें मार्गदर्शन करतील. कारण, पाकिस्तान, इंडोनेशिया व इजिप्त ह्या तीन इस्लामी सरकारांनीं अमेरिकन सरकारकडे तक्रार केली, कीं महमदाच्या पुतळ्याचा नाश करण्यांत यावा; इस्लामला महमदाचीं चित्रें किंवा पुतळे हीं पसंत नाहींत. अमेरिकन सरकारनें तक्रारीस अनुसरून, महमदाचा पुतळा काढून टाकण्यास न्यूयॉर्कच्या पब्लिक वर्क्स कमिशनरला कळविलें. त्याप्रमाणें, तो पुतळा एका तळघरांत नेऊन बंदिस्त ठेवण्यांत आला आहे.

## युनायटेड नेशन्स संघटनेच्या वर्गणीचा भारताचा वाटा

| वर्ष | वर्गणी |
|---|---|
| १९४६ | २६,०३,४०० |
| १९४७ | ३५,८९,००० |
| १९४८ | ४५,३४,६०० |
| १९४९ | ३४,५५,५०० |
| १९५० | ५०,४५,५०० |
| १९५१ | ६६,१७,२०० |
| १९५२ | ७०,३७,००० |
| १९५३ | ६८,८९,९०० |
| १९५४ | ६३,४३,७०५ |
| १९५५ ( अंदाज ) | ५८,३८,५६२ |

## सहकारी विकास

( लेखक : श्री. डी. ए. सावंत, डि. को. ऑफिसर, विकास योजना, कोल्हापूर. पृ. सं. ४०. किंमत ८ आणे )

भारताच्या अभ्युदयासाठी सहकारी चळवळीची पायाशुद्ध प्रगति झाली पाहिजे, असें मत नेहेमीं व्यक्त करण्यांत येतें. मोठमोठीं धोरणें आखलीं जातात, केंद्रीय संस्था स्थापन होतात, परंतु सर्वांत महत्त्वाच्या म्हणजे पायाच्या जागेपर्यंत मात्र सहकारी तत्त्वाचें व आचाराचें लोण पोंचत नाहीं, असें आढळतें. प्राथमिक संस्थांच्या कार्यक्षमतेवरच अखेर सहकारी संघटनेचें यश अवलंबून आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. ह्या थरांत सहकाराचा प्रचार होणें अगत्याचें आहे व त्यांतूनच सहकारी कार्यकर्ते व नेते पुढें आले पाहिजेत. सहकार ह्या विषयावरील वाङ्मय शिक्षणाचा प्रसार नसलेल्या खेड्यांपर्यंत पोंचूं शकत नाहीं; म्हणून खेड्यांतील लोकांना समजेल अशा सोप्या व सरळ भाषेंत शेतकऱ्यांच्या जीवनाशीं संबंध असलेल्या सर्व प्रकारच्या सोसायट्यांची माहिती करून देणाऱ्या पुस्तकाची गरज होती, ती "सहकारी विकासा"नें भागविली आहे. जाड टाइप, चित्रें, इत्यादींमुळें कोणाहि साक्षरास त्यांतील माहिती व विवेचन सहज कळूं शकेल. श्री. डी. ए. सावंत ह्यांचा व्यासंग, अनुभव, तळमळ, ह्या सर्वांचें प्रतिबिंब ह्या पुस्तकांत पडलें आहे. पुस्तकास महाराष्ट्र डि. को. बोर्डाचे चेअरमन, प्रिं. शं. गो. दाभोळकर, ह्यांची छोटीशी प्रस्तावना आहे. सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, श्री. एफ्. एन्. राणा, ह्यांच्या हस्तें २८-४-५५ रोजीं पुस्तकाचें प्रकाशन झालें, त्यावेळीं श्री. राणा ह्यांनीं काढलेले प्रशंसोद्गार पुस्तकाचे प्रारंभीं देण्यांत आले आहेत.

---

## बॉंबे स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन

वरील कॉर्पोरेशनला ३१ मार्च, १९५५ अखेर संपलेल्या वर्षी २,४०,३०४ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड, प्राथमिक खर्च, कर, इत्यादींची तरतूद करून नफावाटणीसाठी १,०६,९८४ रु. राहिले. कॉर्पोरेशननें मुंबई सरकारकडे ३,४३,०१५ रु. मदतीची मागणी केली आहे. ती वरील नफ्यांत मिळवून ३½% किमान डिव्हिडंड वाटलें जाईल. कॉर्पोरेशनकडे २,९०,९३,१५० रु. कर्ज मागणारे १९९ अर्ज आले; त्यांपैकी ३१ अर्जदारांना ६८,३७,००० रु. कर्ज मंजूर करण्यांत आलें. त्यांपैकी १७,३७,००० रु. कर्जाच्या १८ कर्जदारांची प्रत्येकी मागणी ३ लक्ष रुपयांखालीं होती.

---

## मिसेस ॲटलींच्या हातीं ॲटलींच्या मोहिमेचें चाक

मि. ॲटली हे १२ मे रोजीं आपल्या १२,००० मैलांच्या निवडणूक दौऱ्यावर निघाले. मोटार मिसेस ॲटली चालवितात व मागील जागीं मि. ॲटली आपलीं भाषणें तयार करतात. १९४५ मध्यें मिसेस ॲटलींनींच सारथ्याचें काम करून मि. ॲटलींना प्रधानपद मिळवून देण्यास मदत केली होती; १९५१ मधील त्यांचें सारथ्य मात्र तितकें यशस्वी झालें नाहीं.

---

**देवळांचा शिक्षणासाठी उपयोग**—जुनागड येथील तीन देवळांच्या विश्वस्तांनीं देवळाच्या भोंवतीं असणाऱ्या हिरवळीचा व कांहीं खोल्यांचा उपयोग विद्यार्थ्यांना करूं देण्याचें ठरविलें आहे. ह्या ठिकाणीं विद्यार्थ्यांना अभ्यासास बसण्याची परवानगी देण्यांत येईल व नंतर शक्य झाल्यास वर्गहि काढण्यांत येतील.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**१,५०० नवीन शिक्षकांची नेमणूक**—सुशिक्षितामधील बेकारी कमी करण्यासाठी भारतीय सरकारनें आंखलेल्या योजने-प्रमाणें हैदराबाद राज्याच्या ग्रामीण विभागांत मार्च, १९५४ अखेर १,५०० शिक्षक नेमण्यांत आले. राज्य सरकाराच्या शिक्षणखात्याचा जो वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे, त्यांत ही माहिती देण्यांत आली आहे.

**कापसाच्या बियाणाच्या आयातीला बंदी**—पंजाबच्या राज्य-सरकारनें चालू पेरणीच्या हंगामांत राज्यांत कापसाचें बियाणें आयात करण्यास बंदी केली आहे. राज्याच्या डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ह्यांच्या परवानगीनेंच बियाण्याची आयात करता येईल. अयोग्य प्रकारच्या बियाणाची पेरणी होऊं नये म्हणून ही बंदी घालण्यांत आली आहे असें समजतें.

# इन्कमटॅक्स व सुपरटॅक्सचे नवीन दर

| | दर | सरचार्ज |
|---|---|---|
| **— – इन्कमटॅक्स व सुपरटॅक्सचे दर** | | |
| [अ] प्रत्येक विवाहित आणि अविभक्त हिंदु कुटुंबाच्या बाबतींत | | |
| (१) एकूण उत्पन्नाच्या पहिल्या २,००० रु. वर | कांहीं नाहीं | कांहीं नाहीं |
| (२) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या १,००० रु. वर | रुपयास ९ पै | त्यांचा एकविसांश |
| (३) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २५,०० रु. वर | रुपयास १ आणा ९ पै | ” |
| (४) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २५,०० रु. वर | रुपयास २ आणे ३ पै | ” |
| (५) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या ५,००० रु. वर | रुपयास ३ आणे ३ पै | ” |
| (६) एकूण उत्पन्नाच्या राहिलेल्या रुपयांवर | रुपयास ४ आणे | ” |
| [ब] अविवाहित व्यक्तींच्या बाबतींत | | |
| (१) एकूण उत्पन्नाच्या पहिल्या १,००० रु. वर | कांहीं नाहीं | कांहीं नाहीं |
| (२) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या ४,००० रु. वर | रुपयास ९ पै | त्यांचा एकविसांश |
| (३) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २५,०० रु. वर | रुपयास १ आणा ९ पै | ” |
| (४) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २५,०० रु. वर | रुपयास २ आणे ३ पै | ” |
| (५) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या ५,००० रु. वर | रुपयास ३ आणे ३ पै | ” |
| (६) एकूण उत्पन्नाच्या राहिलेल्या रुपयांवर | रुपयास ४ आणे | ” |
| **सुपर टॅक्सचे दर** | | |
| [अ] प्रत्येक व्यक्ति, हिंदु अविभक्त कुटुंब व अन्‌रजिस्टर्ड फर्मच्या बाबतींत | | |
| (१) एकूण उत्पन्नाच्या पहिल्या २०,००० रु. वर | कांहीं नाहीं | कांहीं नाहीं |
| (२) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या ५,००० रु. वर | रुपयास १ आणा | त्यांचा एकविसांश |
| (३) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या १५,००० रु. वर | रुपयास ३ आणे | ” |
| (४) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या १०,००० रु. वर | रुपयास ५ आणे | ” |
| (५) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या १०,००० रु. वर | रुपयास ६ आणे | ” |
| (६) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २०,००० रु. वर | रुपयास ७ आणे | ” |
| (७) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या २०,००० रु. वर | रुपयास ८ आणे | ” |
| (८) एकूण उत्पन्नाच्या त्यानंतरच्या ५०,००० रु. वर | रुपयास ९ आणे | ” |
| (९) एकूण उत्पन्नाच्या राहिलेल्या रुपयांवर | रुपयास ९ आणे ६ पै | ” |
| [ब] प्रत्येक लोकल ॲथॉरिटीच्या बाबतींत | | |
| एकूण सर्व उत्पन्नावर | रुपयास २ आणे ६ पै | रुपयास ३ पै |
| [क] को-ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून असलेल्या व्यक्तींच्या असोसिएशनच्या बाबतींत | | |
| (१) एकूण उत्पन्नाच्या पहिल्या २५,००० रु. वर | कांहीं नाहीं | कांहीं नाहीं |
| (२) एकूण त्यानंतरच्या उरलेल्या रकमेवर | रुपयास २ आणे ३ पै | रुपयास ३ पै |
| [ड] प्रत्येक कंपनीच्या बाबतींत | | |
| एकूण सर्व उत्पन्नावर | रुपयास ४ आणे ९ पै | |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.